२५ वर्षे विश्वासार्हतेची

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

सातारा दि. २५ मे २०२४

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २६० ✻ सातारा ✻ सातारा सोमवार दि. ३ जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# देशात मोदी मॅजिक कायम; इंडिया आघाडी अडखळली

## महाराष्ट्रात महायुतीची सरशी, एनडीए ३५० प्लस तर इंडिया आघाडीला १५० ते १५० जागा

**मुंबई :** लोकसभेच्या ५४३ जागांसाठी देशात सात टप्प्यांमध्ये मतदान झाले. आज शेवटच्या टप्यातील मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदानोत्तर चाचण्यांचे अंदाज समोर आले आहेत. २७२ हा बहुमताचा आकडा कोण गाठू शकेल?, रालोआ विरुद्ध इंडिया आघाडी अशा महामुकाबल्यात कोण बाजी मारेल?, पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्ता राखण्यात यशस्वी होतील की विरोधक धक्का देतील?, ४०० पार 'चा नारा देणारा भाजप कुठपर्यंत मजल मारू शकेल?, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल या मोठ्या राज्यामध्ये काय होणार?, याची देशात उत्सुकता आहे. ४ जूनला या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतील, पण देशाचा साधारण कल जाणून घेण्यासाठी मतदानोत्तर चाचण्यांकडेही सगळ्यांचे लक्ष आहे. या सर्वच मतदानोत्तर चाचण्यांमध्ये ३५० पेक्षा अधिक जागा जिंकून एनडीए तिसऱ्यांदा सरकार स्थापन करेल, तर इंडिया आघाडीला १२५ ते १५० जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

या अंदाजात केरळ आणि तामिळनाडूमध्ये भाजप खाते उघडण्याची शक्यता आहे. एबीपी-सी बोटरच्या एक्झिट पोलमध्ये केरळमध्ये एनडीएला एक ते तीन जागा मिळण्याचा अंदाज आहे, तर यूडीएफला १७ ते १९जागा, एलडीएफला ३३ आणि ३९ इतरांना शून्य जागा मिळण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशात इंडिया आघाडीला एक ते तीन जागा मिळण्याचा तर एनडीएला २६ ते २८ जागा मिळण्याचा अंदाज आहे.



तेलंगणामध्ये एनडीएला सात ते नऊ जागा, इंडिया आघाडीला सात ते नऊ जागा आणि इतरांना ० ते एक जागा मिळत आहेत. तर टक्केवारीमध्ये एनडीएला ३३ टक्के, इंडिया आघाडीला ३९ टक्के, बीआरएसला २० टक्के, एआयएमआयएमला २ टक्के आणि इतरांना ६ टक्के मते मिळण्याचा अंदाज आहे.

आंध्र प्रदेशात एनडीएला ५३ टक्के, भारतीय आघाडीला ३ टक्के, वायएसआरसीपीला ४२ टक्के आणि इतरांना २ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. जागांचा आकडा पाहिल्यास एनडीएला येथे बहुमत मिळताना दिसत आहे. आंध्र प्रदेशात २१ ते २४ जागा एनडीएच्या खात्यात जाणार आहेत. तर, वायएसआरसीपीला ० ते ४ जागा मिळण्याचा अंदाज आहे. आंध्र प्रदेशमध्ये इंडिया आघाडी आपले खाते न उघडण्याची शक्यता आहे.

एक्झिट पोलनुसार कर्नाटकातही भाजपाच्या 'कमळा'लाच 'अच्छे दिन' येताना दिसत आहेत. कर्नाटकातील २८ जागांपैकी २० ते २२ जागा भाजपाला, ३ ते ५ जागा काँग्रेसला, ३ जागा जेडीएसला मिळतील, असा अंदाज आहे.

उत्तर प्रदेशात एनडीएला ६२ तर इंडिया आघाडीला १८ जागा मिळतील, तर बिहारमध्ये एनडीएला २८ ते ३३ तर इंडिया आघाडीला ७ ते ११ जागा मिळण्याचा अंदाज आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, झारखंडमध्ये भाजपचा दबदबा राहणार आहे. दिल्लीत अरविंद केजरीवाल फॅक्टर निष्प्रभ ठरणार असून भाजपला ६ ते ७ जागा मिळण्याचा अंदाज आहे. पंजाबमध्ये शेतकरी आंदोलनाचा भाजपला मतदानाच्या टक्केवारीत फटका बसणार आहे. मात्र, जागांमध्ये सरशी राहील. आसाममधील १४ जागांपैकी १० ते १२ जागा भाजपाप्रणित एनडीएला मिळतील, तर इंडीया आघाडीला २ ते ४ जागा मिळू शकतात, असा एक्झिट पोलचा अंदाज आहे.

त्याचप्रमाणे, ईशान्य भारतातील एकूण ११ जागांपैकी एनडीए ६ ते ९ जागा, इंडिया १ ते ३ जागा तर इतर पक्ष १ ते २ जागा जिंकू शकतील. तसेच एक्झिट पोलनुसार, गोव्यातील दोन लोकसभा जागांपैकी एनडीए एक किंवा दोन्ही जागा जिंकू शकते. पण, मतांच्या टक्केवारीत इंडिया आघाडी पुढे असल्याने (४५ टक्के एनडीए, ४६ टक्के इंडिया) एखादी जागा त्यांच्या पारड्यातही पडू शकते. गुजरातमध्ये भाजपाप्रणित एनडीएला ६३ टक्के मते मिळतील आणि त्या जोरावर ते २६ पैकी २५ किंवा पैकीच्या पैकी जागा जिंकतील, असा अंदाज एक्झिट पोलने वर्तवला आहे.

### इंडिया आघाडी २९५ जागा जिंकेल - खरगे

**लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यातील मतदानादरम्यान दिल्लीत इंडिया ब्लॉकची मोठी बैठक झाली. दक्षिण दिल्लीत राजाजी मार्गावरील काँग्रेस प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासास्थानी झालेल्या या बैठकीला आघाडीत समाविष्ट अनेक पक्षांचे नेते उपस्थित होते. बैठकीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित करताना खरगे यांनी दावा केला की, इंडिया आघाडी २९५ जागा जिंकेल. या बैठकीत इंडिया ब्लॉकचे अनेक नेते उपस्थित होते. यामध्ये काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, के, सी. वेणुगोपाल, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, जितेंद्र आव्हाड, आआपाचे संस्थापक दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, संजय सिंह, राघव चड्ढा, द्रमुकचे टी.आर. बालू, आरजेडीचे तेजस्वी यादव आणि संजय यादव, जेएमएमकडून चंपाई सोरेन आणि कल्पना सोरेन, नॅशनल कॉन्फरन्सचे फारूख अब्दुल्ला, सीपीआयचे डी. राजा, सीपीआय (एम) कडून सीताराम येचुरी, शिवसेनेकडून अनिल देसाई (उद्धव ठाकरे गट) आदी उपस्थित होते. तर तृणमूल काँग्रेस या बैठकीपासून दूर राहिली.**

**महाराष्ट्रात महायुतीची सरशी**

महाराष्ट्रात यंदाच्या निवडणुकीत्त मोठी उलथापालथ पाहायला मिळण्याची शक्यता आहे. मागच्या निवडणुकीत ४१ जागा मिळवणाऱ्या भाजपप्रणीत महायुतीला यंदाच्या निवडणुकीत २२ ते २६ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर महाविकास आघाडी २३ ते २४ जागा मिळवेल, असा अंदाज एबीपी न्यूज-सी व्होटरच्या एक्झिट पोलचा आहे. महाराष्ट्रात यंदाची लोकसभा निवडणूक ऐतिहासिक ठरली. कारण राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन मोठे पक्ष फुटल्यानंतर होत असलेली ही पहिलीच मोठी निवडणूक होती. त्यामुळे या निवडणुकीत नक्की कोण बाजी मारणार, याकडे राज्यासह संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. पक्षफुटीची सहानुभूती महाविकास आघाडीला मिळेल, तर संघटनात्मक ताकदीचा फायदा महायुतीला होईल, असे बोलले जात होते. एक्झिट पोलच्या अंदाजातही याचे प्रतिबिंच दिसत असून राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीत चुरशीची लढत झाली आहे.

एबीपी न्यूज-सी व्होटरच्या एक्झिट पोलनुसार, महाराष्ट्रात भाजपला १७, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सहा तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एक जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मात्र ही एक जागा कोणती असेल याबाबत अद्याप स्पष्टता नाही. तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील काँग्रेस आठ, शरद पवार यांची राष्ट्रवादी सहा आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना नऊ जागांवर जिंकू शकते. तसेच एका जागेवर अपक्ष उमेदवाराचा विजय होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. टीव्ही ९ पोलस्ट्रॅटच्या एक्झिट पोलनुसार, बारामतीतून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांचा विजय होईल. तसेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा बारामतीसह ते लढवत असलेल्या शिरूर, रायगड आणि उस्मानाचाद या चारही मतदारसंघांमध्ये पराभव होईल. या एक्झिट पोलने शरद पवारांच्या राष्ट्रबादीला सहा जागांचा अंदाज वर्तवला आहे.

# विश्वचषकाला आजपासून सुरुवात; यजमान अमेरिकेची विजयी सलामी

## एकूण २० संघांचा सहभाग, अंतिम फेरीचा सामना २९ जूनला

**मुंबई :** टी २० विश्वचषक स्पर्धेचे बिगुल वाजले असून आज रविवार २ जून रोजी सकाळी ६ वाजता अमेरिका आणि कॅनडा यांच्यातील सामन्याने स्पर्धेला सुरुवात झाली आहे. ही स्पर्धा अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये पार पडत आहे. त्यामुळे या स्पर्धेबाबत प्रचंड उत्सुकता आहे. १४ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर आयसीसी इव्हेंट वेस्ट इंडिजमध्ये होत आहे. यापूर्वी २०१० मध्ये येथे वर्ल्डकप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या वर्ल्डकप स्पर्धेत काही गोष्टी पहिल्यांदाच होणार आहेत. त्यामुळे या स्पर्धेची उत्सुकता आणखी शिगेला पोहोचली आहे. तसेच काही टीम पहिल्यांदाच टी२० वर्ल्डकप खेळत असून काही नियम पहिल्यांदाच लागू होत आहेत. टी २० वर्ल्डकप स्पर्धेला भारतीय वेळेनुसार दुपारी २ वाजता सुरुवात होणार आहे. या स्पर्धेची सुरुवात अमेरिका आणि कॅनडा यांच्यातील सामन्याने झाली असून स्पर्धेच्या अंतिम फेरीचा सामना २९ जूनला होणार आहे.




स्पर्धेतील एखादा सामना बरोबरीत सुटला तर त्याचा निर्णय सुपर ओव्हरमध्ये होईल. सुपर ओव्हरमध्येही टाय झाला तर परत सुपर ओव्हर होईल. एक तासाचा अतिरिक्त वेळ संपेपर्यंत सुपर ओव्हर चालेल. तरीही निकाल लागला नाही तर साखळी आणि सुपर ८ फेरीत दोन्ही संघांना प्रत्येकी १ गुण दिला जाईल. जर उपांत्य फेरीत अशी स्थिती उद्भवली तर सुपर ८ फेरीत टॉपला असलेल्या संघाला पुढे संधी मिळेल.

टी२० नियमानुसार, कोणत्याही सामन्याचा निकाल देण्यासाठी कमीत कमी ५ षटके होणं गरजेचं आहे. साखळी फेरी आणि सुपर ८ फेरीत हा नियम लागू असेल. सामना झालाच नाही तर गुण वाढून दिले जातील. पण उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीसाठी नियम वेगळा असेल.

उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत कसा निर्णय असेल?

उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीचा निकाल देण्यासाठी कमीत कमी १०-१० षटके होणं गरजेचं आहे. जर तसं झालं नाही तर उपांत्य फेरीसाठी राखीव दिवस आहे, त्यामुळे सामना दुसऱ्या दिवशी होईल. पण दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात असं होणार नाही. कारण एका दिवसाच्या अंतराने अंतिम सामना असेल. त्यामुळे राखीव दिवस नाही. पण त्याच दिवशी सामना संपवण्यासाठी ४ तास १० मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जाईल. पण तरीही निकाल लागला नाही, सुपर ८ मधील आघाडीच्या संघाला अंतिम फेरीत स्थान मिळेल, अंतिम फेरीसाठी ३० जून हा राखीव दिवस आहे. जर सामना झाला नाही तर दोन्ही संघांना संयुक्त विजेता घोषित केले जाईल.

भारत गट अ मध्ये असून यात अमेरिका, पाकिस्तान, आयर्लंड आणि कॅनडा हे देश आहेत. तर टीम इंडियाचे ग्रुप स्टेज सामने भारतीय वेळेनुसार खेळले जातील.

वर्ल्डकप स्पर्धेत एक नियम नव्याने असणार आहे. स्पर्धा वेगाने पूर्ण होण्यासाठी स्टॉप क्लॉक हा नियम असणार आहे. यात एक षटक संपल्यानंतर दुसरं षटक सुरु करण्यासाठी अवघ्या ६० सेकंदाचा अवधी असेल. जर असं झालं नाही तर दोन वेळा वॉर्निंग दिली जाईल. पुन्हा तसंच केलं तर मात्र ५ धावा पेनल्टी म्हणून दिल्या जातील.

टी२० वर्ल्डकप स्पर्धेत एकूण २० संघ भाग घेणार आहे अमेरिकेत स्पर्धा असल्याने त्या संघाला स्पर्धेत स्थान मिळालं आहे कॅनडा, युगांडा पहिल्यांदा वर्ल्डकप स्पर्धा खेळणार आहेत. तसेच भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, नेपाळ, दक्षिण अफ्रिका, श्रीलंका, बांगलादेश, न्यूझीलंड, नेदरलैंड, स्कॉटलैंड, आयलँड, पापुआ न्यू गिनी, वेस्ट इंडिज, नामिबिया, अफगाणिस्तान आणि ओमान या स्पर्धेत आहेत.

वर्ल्डकप स्पर्धेत साखळी फेरी आणि सुपर ८ फॉर्मेट आहे. २० संघांची विभागणी ५-५ च्या चार गटात केली आहे. प्रत्येक गटातून आघाडीचे २ संघ सुपर ८ फेरीत खेळतील, तेथे ४-४ चे दोन ग्रुप असतील. सुपर ८ मधील २-२ संघ उपांत्य फेरीत पोहोचतील आणि अंतिम सामना होईल.

# नेपाळ्यांचा भारतीय सीमेत घुसून हल्ला

## वनविभागाच्या पाच चौक्या जाळल्या



**दिल्ली :** नोव्हेंबरमध्ये नेपाळी नागरिकांनी शीसम या लाकडाची दोन झाडे तोडली होती. तेव्हा १० लोकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र कोणीही सापडला नव्हता. शनिवारी धर्मापूर रेंजच्या वन क्षेत्राधिकाऱ्यांनी एका संशयित नेपाळी नागरिकाला ताब्यात घेतले होते. त्याला रात्री सोडून देण्यात आले होते. मात्र, याचा राग आलेल्या नेपाळी नागरिकांनी काही चौक्यांना आगी लावल्या, असे कतर्नियाघाटचे वनाधिकारी बी शिव शंकर यांनी सांगितले.

कतर्निया घाट जंगलाचा ४५ किमीचा पट्टा नेपाळच्या सीमेला लागून आहे. तर पूर्ण बहराइच जंगल ७० किमीच्या सीमेवर आहे. नेपाळ हा भारताचा मित्र असल्याने सर्व सीमा खुली आहे. यामुळे या सीमेवरून मोठ्या प्रमाणावर तस्करी केली जाते. या लोकांना रोखण्यासाठी कतर्नियाघाटच्या सीमावर्ती भागात सशस्त्र सीमा सुरक्षा दलाच्या १६ चौक्या बनविण्यात आल्या आहेत. तर पूर्ण सीमेवर २३ चौक्या आहेत. तरीही नेपाळी भारतीय सीमेत घुसून वनविभागाच्या चौक्यांना आगी लावत आहेत. चौक्यांना आग लावल्यामुळे या उष्णतेच्या दिवसांत जंगलाला आग लागण्याची शक्यता होती.

# मान्सूनने केरळमधील मुक्काम हलवला

## तमिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटकात दाखल

**पुणे :** दोन दिवसांपासून केरळमध्ये मॉन्सूनचा मुक्काम होता, तो आता पुढे सरकला आहे. रविवारी (दि.२) मॉन्सूनने तमिळनाडू, कर्नाटकचा काही भाग, आंध्र प्रदेशचा काही भाग आणि पूर्वकडील राज्यांमध्ये शिरकाव केला आहे. येत्या दोन-तीन दिवसांमध्ये मॉन्सूनमहाराष्ट्रातदाखल होण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे.

यंदा वेळेआधीच मॉन्सून देशात दाखल झाला आहे. केरळमध्ये दोन दिवसांपूर्वी दाखल झालेला मॉन्सून पुढे सरकला नव्हता. दोन दिवसानंतर रविवारी मॉन्सूनने मोठी वाटचाल केली आहे. बराच भाग त्याने व्यापला असून, पुढील प्रवासही वेगाने होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.नैऋत्य मौसमीपाऊसबंगालच्या उपसागाराच्या काही भागात दाखल झाला आहे.

पुढील दोन दिवसांत मध्य अरबी समुद्राच्या, बंगालच्या प. मध्य व वायव्य भागात दाखल होईल.

महाराष्ट्राराज्यात पुढील पाच दिवस तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. कोकणात सिंधुदुर्ग वगळता उर्वरित जिल्ह्यात वातावरण उष्ण व दमट राहील.

रत्नागिरीत ३ जूनपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. कोकणात यलो अलर्ट दिला आहे.मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भात बऱ्याच जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज असून, यलो अलर्ट दिला आहे.पुणेव परिसरात दुपारी आकाश निरभ्र तर सायंकाळी आकाश ढगाळ राहील.

# ठाकरेंच्या 'मशाली'ची राजू शेट्टींना धग

## हातकणंगलेत सत्यजीत पाटीलच भारी?




**मुंबई :** लोकसभा निवडणुकीचा सातवा टप्पा संपताच अनेक सर्वे कंपन्यांनी एक्झिट पोलनुसार संभाव्य जिंकणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली. संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या हातकणंगले लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे शिवसेनेचे सत्यजीत पाटील निवडणूक हे जिंकणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

निकालाला अद्याप ४८ तास असले तरी एक्झिट पोलच्या अंदाजाने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टींची धडधड वाढली आहे. शेट्टीने महाविकास आघाडीकडून लढण्यास विरोध दर्शविल्याने उद्धव ठाकरे यांनी सत्यजित यांच्या रूपाने बाण सोडला. त्यामुळे स्वाभिमानीचे नेते शेट्टी यांची अडचण झाल्याचे संभाव्य चित्र दिसत आहे.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून शिवसेना ठाकरे गटातून माजी आमदार सत्यजीत पाटील-सरुडकर यांना उमेदवारी जाहीर झाल्याने निवडणूक चांगलीच रंगली. महाविकास आघाडीत थेट न प्रवेश करता महाविकास आघाडीने आपणास बिनशर्त पाठिंबा द्यावा, या भूमिकेवर राजू शेट्टी ठाम असल्याने निवडणुकीच्या कालावधीत काही दिवस ताणाताणी झाली.

काही भाजपप्रेमी आपल्या पाठिंब्याच्या आड येत असल्याचे सांगून त्यांनी जयंत पाटील यांचे नाव न घेता निशाणा साधल्याने गुंता वाढला. मात्र ठाकरेंनी माजी आमदाराच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकून चर्चाच थांबवली. तेथे चौरंगी लढत झाली.

शिवसेनेचे विद्यमान खासदार धैर्यशील माने यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार सत्यजीत पाटील यांनी निवडणूक लढवली. याशिवाय म्हणजे बहुजन आघाडीकडून जिल्हा परिषदेत माझे अध्यक्ष डी. सी. पाटील मैदानात होते त्यामुळे स्वाभिमानीचे माजी खासदार शेट्टी यांना स्वतंत्र लढावे लागले.

महविकास आघाडीमध्ये सहभागी होवून स्वाभिमानीने हातकणंगलेची जागा लढवावी, यासाठी काँग्रेस आग्रही राहिले. शेट्टींना आघाडीत घेण्याचा प्रयत्न सुरू होता. मात्र शेट्टी यांनी महाविकास आघाडीने पाठिंबा द्यावा, कुणाचेही फोटो वापरणार नसल्याच्या भूमिकेवर अडून बसले.

स्वतः शेट्टी हे शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याने ते आपल्याला पाठींबा देतील, असा विश्वास होता. त्यातच आघाडीतील राष्ट्रवादीने शेट्टींना पाठींबा देण्यास छुपा विरोध दर्शविला. या परिस्थितीत ठाकरे यांनी स्वतःच्या कार्यकर्त्यांवर विश्वास दाखवत पन्हाळा-शाहुवाडीचे माजी आमदार सत्यजीत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. त्यातच शेट्टींच्या अडचणीत भर पडली.

राजू शेट्टींवर नाराज असलेले उद्धव ठाकरे यांना शाहूवाडीची भौगोलिक आणि राजकीय समीकरणे पाहता आघाडीला सत्यजीत पाटील जास्त सोयीचे वाटले. हातकणंगले मतदारसंघात ठाकरे यांचे तीन माजी आमदार आहेत. सत्यजीत पाटील २००४ व २०१४ असे दोनदा शिवसेनेचे आमदार होते. तर वडील बाबासाहेब पाटील १९९० ला सेनेतूनच आमदार झाले होते.

याशिवाय इस्लामपूर आणि शिराळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन आमदार आहेत. वाळवा-शिराळ्यावर जयंत पाटील व आमदार मानसिंगराव नाईक यांची चांगली पकड आहे. शिवाय सत्यजीत पाटील यांचे वडील विश्वास साखर कारखान्याचे मागील २५ वर्षांपासून उपाध्यक्ष आहेत. त्यांचा शिराळा आणि वाळवा तालुक्यातही संपर्क आहे. त्यामुळे सत्यजीत पाटलांचा मार्ग सुकर झाला. २०१९ च्या निवडणुकीत खासदार माने यांनी खेळलेले 'मराठा कार्ड हे यावेळी सरुडकर यांना उपयोगी पडणार आहे. वंचितने या मतदारसंघातून जैन समाजातील डी. सी. पाटील यांना उमेदवारी मिळाली. पाटील हे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आहेत. त्यांचा समाजावरही मोठा प्रभाव आहे. या समाजाच्या मतांवर शेट्टी यांचीही भिस्त होती. पण पाटील यांच्या उमेदवारीने या समाजातील मतांची विभागणी होईल.

## संपादकीय

# भरोसा कुणावर ठेवावा?




विधानसभेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका लढताना कोणता झेंडा हाती घ्यायचा, यादृष्टीने लोकसभा निवडणुकीचे निकाल पथदर्शक ठरणारे असतील; म्हणूनच राजकीय संबंधितांना त्याबाबतची अधिक उत्सुकता असणे स्वाभाविक आहे.लोकसभा निवडणुकीचा निकाल अवघ्या ४८ तासांवर येऊन ठेपल्याने 'एक्झिट पोल'चे सर्व्हे व सट्टा बाजारही जोरात आहे; पण नेमका भरोसा कुणावर ठेवावा, हाच खरा प्रश्न आहे; कारण प्रत्येकाचेच अंदाज अगर आडाखे वेगवेगळे आहेत.

अर्थात या निकालाची उत्सुकता अधिकतर त्याच लोकांना आहे, ज्यांना यापुढील अन्य निवडणुकांना सामोरे जायचे आहे. ते जाताना आपली वाट नेमकी कोणती असावी, या दृष्टिकोनातून ही उत्सुकता आहे.लोकसभा निवडणुकीसाठी देशातील सातव्या व अखेरच्या टप्प्यातले मतदान काल आटोपले असून, आता दोन दिवसांनी निकाल हाती येतील.

हे निकाल काय असू शकतात याबाबतचे विविध अंदाज सर्व्हेंच्या माध्यमातून वर्तविण्यात आले असून, काही जण सट्टा बाजाराचा कल पडताळत आहेत; पण या दोन्ही बाबींत फारशी एकवाक्यता आढळताना दिसत नाही. अर्थात, यासंबंधी अधिक सारस्य आहे ते राजकीय परिघातील लोकांना, कारण यानंतर होऊ घातलेल्या विविध निवडणुकांसाठी कोणती वाट धरावी, यासाठी हा निकाल दिशादर्शक ठरणार आहे.यंदाच्या निवडणुकीची स्थिती गेल्या दोनवेळेसारखी नव्हती हे नक्की. आपल्या राज्यापुरतेच बोलायचे झाले तर शिवसेना व राष्ट्रवादीतील दुभंगामुळे त्या-त्या एकीकृत पक्षात काम केलेल्यांची मोठी अडचण झाली. बरे, यंदा निवडणूक प्रचार असा काही टोकदार झाला की, अनेकांना एकमेकांसमोर जाणे मुश्किलीचे झाले. लोकसभा मतदारसंघाचा परीघ मोठा असतो; पण यापुढील विधानसभा व महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुका लढायच्या तर सर्वांच्याच सहकार्याचे दरवाजे उघडे असू द्यावे लागतात; मात्र लोकसभेच्या निवडणुकीत अनेकांनी ते स्वत:हून बंद करून घेतल्यासारखे झाले.महत्त्वाचे म्हणजे, राज्यातील निकालात भाजप व काँग्रेस या दोन प्रमुख पक्ष्यांच्या वर्चस्वाचा फैसला तर होणार आहेच; पण त्याखेरीज शिवसेना व राष्ट्रवादीतील दोन्ही गटांच्या मातब्बरीचाही निकाल लागणार असल्याने लोकसभेनंतर पक्ष बदलांचे वारे मोठ्या प्रमाणात वाहू शकतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तिकीट मिळवून निवडून यायचे तर त्यादृष्टीने हे गरजेचे ठरेल.या आगामी निवडणुकांच्या मांडवाखालून जाऊ इच्छीणाऱ्यांच्या तिकिटांचे मार्ग लोकसभेसाठी त्यांच्या विधानसभा क्षेत्रात, जि.प. गटात किंवा महापालिका वॉर्डात मतांचे गणित काय राहिले, यावर अवलंबून राहणार आहे. त्यामुळेच संबंधितांना या निकालाची अधिक उत्सुकता आहे.साधारण मतदारांना उत्सुकता असेल तर ती याचीच की, विविध पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी प्रचार सभांमध्ये जी वारेमाप आश्वासने देऊन ठेवली आहेत, ती खरेच पाळली जाणार का, याची. शेतकरी असोत, की महिला वा बेरोजगार तरुण; यांच्या बँक खात्यात सांगितले गेले त्याप्रमाणे खरेच पैसे पडणार का? कारण या घटकाला देशाच्या 'जीडीपी'शी घेणे नाही, त्यांचे जगण्याचे प्रश्नच वेगळे आहेत; पण त्याबद्दल या निवडणुकीत फारसे बोललेच गेले नाही. या प्रश्नांबद्दल राजकारण्यांनाही फारसे काही वाटेनासे झाले आहे आणि याची जाणीव मतदारांनाही झाल्यानेच की काय, यंदा लोकसभेसाठी मतदानाचा टक्का घटलेला दिसून आला.सारांशात, राज्यातील राजकीय वाटचालीची दिशा या निकालातून स्पष्ट होणार आहे.

शिवाय, सर्व्हेतून दाखविला जाणारा निकाल खरा ठरो की सट्टा; गुलाल कुणीही उधळो, प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनांचा विसर निवडून येणाऱ्यांना पडू नये म्हणजे झाले.

# साता-यात तुतारी वाजणार की कमळ फुलणार?

**सातारा :** पश्चिम महाराष्ट्राच्या साखरपट्ट्यात दहा लोकसभा मतदारसंघांपैकी सातारा लोकसभा मतदारसंघ हा राजकीय दृष्ट्या प्रचंड संवेदनशील आहे. महायुतीने या जिल्ह्यामध्ये लावलेला जोर, राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने ऐनवेळी साताऱ्यावरील सोडलेला दावा व शरदचंद्र पवार गटाने महाविकास आघाडीच्या माध्यमातून दिलेली लढत यामुळे यंदाची सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीची लढत प्रचंड चुरशीची ठरली.

राष्ट्रवादीचा बालेकिल्ला अशी ओळख असणाऱ्या सातारा जिल्ह्यात यंदा प्रथमच घड्याळाची टिकटिक ऐकायला मिळणार नाही, मात्र पवार गटाची तुतारी वाजणार की बालेकिल्ल्यात कमळ फुलणार? याची सर्वांना उत्सुकता लागून राहीली आहे.

सातारा मतदारसंघांमध्ये भाजपकडून उदयनराजे भोसले आणि राष्ट्रवादी (शरहचंद्र पवार) पक्षाकडून शशिकांत शिंदे यांच्यात थेट लढत झाली आहे. सहकार क्षेत्राचा प्रभाव असलेल्या या मतदारसंघात येथील मतदार स्थानिक नेत्यांशी जोडला गेलेला आहे. त्याचा परिणाम येथील निवडणुकीत होताना दिसला. शशिकांत शिंदे यांच्या तुलनेत उशिरा उमेदवारी जाहीर झाल्यामुळे उदयनराजे भोसले यांना प्रचारासाठी



कमी वेळ मिळाला. तरीही कराड उत्तर, कराड दक्षिण आणि पाटण या तीन मतदारसंघांमध्ये अकरा दिवस प्रचार करून उदयनराजे यांनी चांगला प्रभाव असलेल्या या मतदारसंघात येथील मतदार स्थानिक नेत्याशी जोडला गेलेला आहे. त्याचा परिणाम येथील निवडणुकीत होताना दिसला. शशिकांत शिंदे यांच्या तुलनेत उशिरा उमेदवारी जाहीर झाल्यामुळे उदयनराजे भोसले यांना प्रचारासाठी कमी वेळ मिळाला. तरीही कराड उत्तर, कराड दक्षिण आणि पाटण या तीन मतदारसंघांमध्ये अकरा दिवस प्रचार करून उदयनराजे यांनी चांगली वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. पाटण तालुक्यात उदयनराजे यांच्यासाठी स्वतः पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी ११ सभा घेतल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कराड येथील सभेचा फायदा उदयनराजे यांना होताना दिसला.

जिल्ह्यातील उलटफेर संवेदनशील

महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील राजकीय टशन अधिक धारदार होताना दिसून येत आहे. सातारा जिल्ह्यामध्ये १२ लाख मतदारांनी भापला मतदानाचा हक्क बजावला सातारा जिल्हाात ६२ टक्क्के मतदान झाले आहे तालुक्यात उदयनराजे यांच्यासाठी स्वतः पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी ११ सभा घेतल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कराड येथील सभेचा फायदा उदयनराजे यांना होताना दिसला.

जिल्ह्यातील उलटफेर संवेदनशील

महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील राजकीय टशन अधिक धारदार होताना दिसून येत आहे. सीतारा जिल्ह्यामध्ये १२ लाख मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. सातारा जिल्ह्यात ६३ टक्के मतदान झाले आहे. मतदार राजाचा हा कौल कोणाला मिळणार याची राजकीय उत्सुकता आहे. पश्चिम महाराष्ट्राचा साखरपट्ट्याचा मध्य म्हणून सातारा जिल्ह्याची भौगोलिकता ही प्रसिद्ध आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील उलटफेर हे राजकारणाच्या दृष्टिकोनातून संवेदनशील असणार आहेत.

## निकालाकडे अवघ्या राज्याचे लक्ष

### कोणत्या मतसंघात कोणाला फायदा ?

**महायुतीतील घटक पक्षांनी प्रभावी प्रचार केल्याने कोरेगाव, वाई, सातारा या विधानसभा मतदारसंघात उदयनराजे यांना फायदा मिळू शकतो, असे जाणकारांचे मत आहे. या उलट कराड दक्षिण, कराड उत्तर आणि पाटण या विधानसभा मतदारसंघांमध्ये शशिकांत शिंदे यांच्या बाजूने वातावरण अनुकूल असल्याचा दावा केला जात आहे. विशेषतः कराड दक्षिण आणि पाटण मतदारसंघातील बहुतांश माथाडी कामगारांचा कल हा शशिकांत शिंदे यांच्या बाजूने जाताना दिसेल, असे अंदाज व्यक्त होत आहे.**

### कोणत्या मतसंघात कोणाला फायदा ?

**महायुतीतील घटक पक्षांनी प्रभावी प्रचार केल्याने कोरेगाव, वाई, सातारा या विधानसभा मतदारसंघात उदयनराजे यांना फायदा मिळू शकतो, असे जाणकारांचे मत आहे. या उलट कराड दक्षिण, कराड उत्तर आणि पाटण या विधानसभा मतदारसंघांमध्ये शशिकांत शिंदे यांच्या बाजूने वातावरण अनुकूल असल्याचा दावा केला जात आहे. विशेषतः कराड दक्षिण आणि पाटण मतदारसंघातील बहुतांश माथाडी कामगारांचा कल हा शशिकांत शिंदे यांच्या बाजूने जाताना दिसेल, असे अंदाज व्यक्त होत आहे.**

# सांगली सिव्हिल हॉस्पिटलच्या धर्तीवर उदगाव येथे ग्रामीण रुग्णालयाची उभारणी

**शिरोळ :** ब्लड स्टोरेज,अपघात कक्ष, एक्स-रे रूम, शवविच्छेदन रूम, मायनर ऑपरेशन थिएटर, सर्जिकल ओपीडी, पॅथॉलॉजी लॅब, डेंटल ओपीडी, आयुष ओपीडी, मेडिकल रूम यासह पोलीस चौकी व विविध अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या माध्यमातून सांगली सिव्हिल हॉस्पिटलच्या धर्तीवर उदगाव येथे ग्रामीण रुग्णालयाची उभारणी करण्यात येत आहे. माजी आरोग्य राज्यमंत्री आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या दूरदृष्टीतून १४ कोटी रुपयांचा निधी या ग्रामीण रुग्णालयासाठी लावण्यात आला असून या रुग्णालयाचे काम पूर्णत्वाकडे आले आहे. सदरच्या रुग्णालयामुळे सांगली सिव्हिल हॉस्पिटल व कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिला राजे शासकीय रुग्णालयातील सर्व सेवा सुविधा या रुग्णालयात मिळणार असल्याने शिरोळ तालुक्यातील गोरगरीब जनतेचा पैसा व वेळ वाचणार असून हे रुग्णालय गोरगरीब व सामान्य जनतेचे आरोग्यमंदिर ठरणार आहे.

४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य या फंडातून माजी आरोग्य राज्यमंत्री आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी आपल्या आरोग्य मंत्री पदाच्या कार्यकाळात सदरचे रुग्णालय मंजूर केले आहे. यासाठी सुमारे १४ कोटी रुपयांचा निधी लावला असल्याने अगदी सुसज्ज आणि आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर या रुग्णालयात करण्यात येणार आहे.

शिरोळ तालुक्यातील जनतेला आधुनिक व मोफत वैद्यकीय सेवा घेण्यासाठी सांगली येथील शासकीय रुग्णालय तसेच कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयात जावे लागत होते. शिरोळ तालुका हा कर्नाटक सीमा भागावर असल्याने सांगली तसेच कोल्हापूर हे दोन्ही शहरांचे अंतर जास्त असल्यामुळे अपघातग्रस्त, सर्पदंश, महिलांच्या बाळंतपणासाठी तसेच अत्यावश्यक सेवेसाठी मोठे अंतर कापावे लागत होते. मात्र, या सर्वच सुविधा शिरोळ तालुक्यात निर्माण करण्यात आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांना यश आले आहे. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालय म्हणून याची लवकरच नवी ओळख निर्माण होणार असल्याचे आमदार यड्रावकर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

सदरचे रुग्णालय हे १ एकर क्षेत्रात सामावले आहे. त्या रुग्णालयात इमारतीसाठी ७ कोटी ७० लाख रुपये, अंतर्गत रस्त्यांसाठी ४९ लाख ६१ हजार रुपये यासह फर्निचर, इलेक्ट्रिकल, पाणीपुरवठा, पार्किंग, रेन वॉटर हार्वेस्टिंग यासह अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसाठी एकूणच १४ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येत आहे. गेल्या वर्षभरापासून सदरच्या इमारतीचे काम सुरू आहे. येत्या सहा महिन्यात सदरचे सुसज्ज आणि अत्याधुनिक रुग्णालय रुग्णांच्या सेवेसाठी सज्ज असणार आहे. सदरच्या रुग्णालयाचे काम ठाणे येथील एई इन्फ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड कंपनी करीत आहे.

सदरच्या रुग्णालयात मेडिकल रूम डेंटल, ओपीडी रिफ्लेक्टर रुम, आयुष ओपीडी, आयसीटीसी लॅब, आयसीटीसी कन्सल्टिंग, मायनर ऑपरेशन थेटर, सर्जिकल ओपीडी, इंजेक्शन रुम, मेडिकल ओपीडी, एक्स-रे रूम, पॅथॉलॉजी लॅब, ब्लड स्टोरेज, अपघात कक्ष, पुरुष वॉर्ड, महिला वॉर्ड, शवविच्छेदन रुम, पोलीस चौकी व रुग्णवाहिका पार्किंग यासह अनुभवी शासकीय डॉक्टरांची टीम व अत्याधुनिक सेवा सुविधा या रुग्णालयात उपलब्ध करण्यात येणार आहेत.

**गोरगरिबांचे होणार आरोग्यमंदिर**

शिरोळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासाबरोबर तालुक्यातील जनतेच्या आरोग्याची काळजी आमदार डॉक्टर राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी घेतली आहे. सांगली व कोल्हापूर येथील शासकीय रुग्णालयाच्या धर्तीवर सदरचे ग्रामीण रुग्णालय बांधण्यात येत असून यामध्ये अत्याधुनिक सर्वच सेवा सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत.

## अनुप मधाळे यांना उद्योग सन्मान पुरस्कार

**कुरुंदवाड :** येथील युवा माजी नगरसेवक व दयावान बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक चेअरमन अनुप मधाळे यांना कोल्हापूर येथील उद्योग क्षेत्रात प्रतिष्ठेचा असलेला उद्योग सन्मान पुरस्कार तुझ्यात जीव रंगला फेम अभिनेत्री अक्षया देवधर हिच्या हस्ते देऊन सन्मान करण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यात उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीने हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते अनुपमदाळे हे सामाजिक कार्यात अग्रभागी असून राम बेसन मिल हॉटेल अनुप दयावान तालीम व बहुउद्देशीय संस्था स्थापन करून बेरोजगारांना रोजगार मिळवून देत उद्योग व्यवसाय चांगल्या पद्धतीने चालवल्यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली होती.

# शासकीय आयटीआय प्रवेश प्रक्रिया सुरू

**सातारा :** शासकीय आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) वाई, ही शासकीय संस्था असून कारखान्यांना आवश्यक असे कुशल मनुष्यबळ प्रशिक्षित करून, ग्रामीण भागातील लोकांना कौशल्याच्या बळावर स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सहाय्य करते. संस्थेत कॉम्प्युटर ऑपरेटर, फिटर, टर्नर, इलेक्ट्रिशन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, पेंटर जनरल,शीट मेटल वर्कर. हे ट्रेड उपलब्ध असून, विद्यार्थ्यांना पाचशे रुपये प्रति महिना विद्यावेतन दिले जाते, तसेच एसटी पासची सुविधा उपलब्ध आहे. मुलांसाठी हॉस्टेलची सुद्धा सुविधा उपलब्ध आहे. मुलींसाठी ३० टक्के जागा राखीव आहेत.

दहावी आणि बारावी समक्षता म्हणजेच आयटीआय सोबतच विद्यार्थ्यांना दहावी व बारावी चे प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे दहावी उत्तीर्ण उमेदवारांना आयटीआय झाल्यानंतर एकाच वेळेस आयटीआयचे व बारावीचे प्रमाणपत्र सुद्धा मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची दोन वर्षाची बचत होणार आहे . वाई, शिरवळ, सातारा ,मधील नामांकित कंपन्यांमध्ये प्रचंड प्रमाणात आयटीआय मधील उमेदवारांची मागणी आहे. त्यामुळे आयटीआय पास झाल्यानंतर रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध आहे. आयटीआय मध्ये अत्याधुनिक सुसज्ज मशनरी व तज्ञ प्रशिक्षक वर्ग ही उपलब्ध आहे. आयटीआय ची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सोमवार, दि . ३ जून पासून सुरू होत आहे. प्रवेशासाठी ची वेबसाईट www.admission.dvet.gov.in ही असून या संकेतस्थळावर भेट देऊन इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष अर्ज भरावा, अधिक माहितीसाठी आयटीआय वाई ,पी १७, एमआयडीसी मांढरदेव रोड, वाई. येथे संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे प्राचार्य मिलिंद उपाध्ये यांनी केले आहे.

# सातारा जिल्हा पर्यटक उद्योग व्यवसायाचे धोरण

**सातारा :** लवकरच मान्सूनचे आगमन सर्वत्र होईल जूनच्या १५ तारखेनंतर अनेक पर्यटकांचा ओढा कास बामनोली वजराई धबधबा ठोसेघर महाबळेश्वर या पर्यटन स्थळाकडे सुरू होईल .पर्यटक पुढील डिसेंबर पर्यंत तर काही ठिकाणी वर्षभर आवर्जून भेटी देतात व निसर्गाचा आनंद लुटतात .सातारा जिल्ह्याला निसर्गाचे देणे आहे. हे अनमोल देणे आपण सर्व सातारकरांनी जपलेले आहे या सर्व पर्यटन स्थळांना आपण नेहमीच स्वच्छ सुंदर आपुलकीने जपले आहे सर्व पर्यटकांचे आपण स्वागत करतो व जे व्यावसायिक आहेत ते पर्यटकांना अतिथी देवो भव प्रमाणे मनोभावे व्यावसायिक सेवा करतो .

आज कोणतीही कंपनी किंवा एखाद्या प्रोजेक्टवर काम करत असताना पुढील अनेक महिने वर्षाचे नियोजन केले जाते .सातार मधील सर्व अनुभवी उद्योजक पर्यटन क्षेत्रात काम करणारे मान्यवर सोशल मीडिया व प्रिंट इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये काम करणारे आमचे बंधू भगिनी नगरपालिका ,जिल्हा परिषद ,जिल्हा प्रशासन या सर्वांनी एकत्रित येऊन पुढील आठ नऊ महिन्यांमध्ये व पुढील काळामध्ये येणाऱ्या पर्यटकांचा साताऱ्या जिल्ह्यातील सर्व व्यावसायिक यांना आर्थिक उलाढाल होण्यासाठी कसा फायदा करून घेता येईल याची रूपरेषा तयार करावी लागेल. सातारा जिल्ह्यामध्ये चाळकेवाडी ,ठोसेघर धबधबा पूर्ण महाराष्ट्रभर देशभर सुपरिचित आहे त्याचबरोबर सज्जनगड तर दुसऱ्या बाजूला कास, बामनोली, कोयना धरणाचे बॅकवॉटर व वजराई धबधबा पाटण तालुक्यातील कोयना नगर, ओझरडे धबधबा कराड तालुक्यातील अनेक पर्यटन क्षेत्र ,वाई महाबळेश्वर मध्ये असलेले अनेक गड किल्ले तसेच पर्यटन क्षेत्र अगदी मान खटाव मध्ये देखील अनेक तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळे आहेत .या सर्वांचा उपयोग सातारातील व्यावसायिकांना करून घेता आला पाहिजे त्यासाठी रूपरेषा आखली पाहिजे.

छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सातारा जिल्ह्यामधील गड किल्ले आहेत व संगम माहुली परिसर कृष्णा कोयनेचा संगम असलेले प्रीतीसंगम फाशीचा वड, बारा मोटेची विहीर ,झाशीची राणी यांचे मूळ गाव धावडशी ,शूरवीरांचे गाव अपसिंगे मिलिटरी ,साहित्यिकांचे गाव कलाकार कवी यांची गाव या सर्व जास्तीत जास्त पर्यटकांनी या विविध ठिकाणी भेट देण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे .

आज जो पर्यटक येत आहे त्यांच्या कुटुंबातील आई-वडिलांचे सरासरी वय पाहता त्यांचे शिक्षण अगदी बऱ्याच लोकांचे शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्या कोणत्यातरी शाळेत कॉलेजमध्ये झालेले असेल तोच भावनिक धागा धरून पोवई नाक्यावरील रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षणाचे भगीरथ कर्मवीर भाऊराव अण्णा यांच्या समाधी स्थळापर्यंत पर्यटक येतील तशी भावनिक व्यवस्था ही जिल्ह्याचे माहिती व जनसंपर्क अधिकारी यांनी केली पाहिजे .

केवळ कास पठाराचे पुष्प धबधबा यांचे माहिती प्रसारित करून सातारा जिल्ह्यातील उद्योजकांना व्यवसायिकांना त्याचा लाभ होणार नाही पर्यटकांमध्ये देखील अनेक जण हे आपल्या महान विचारवंत स्वातंत्र्यवीर यांना मनोमनी खूप मानतात त्यांनी त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या विविध ठिकाणी पर्यटक भेट देण्यासाठी अतुर असतात त्यांचे बालपण त्यांनी समाज हितासाठी केलेल्या कार्याची ठिकाणी त्यांचे शिक्षण व अशा अनेक जीवनातील घटना ठिकाणाला पर्यटक भेट देण्यासाठी इच्छुक असतात त्यामधून त्यांना प्रेरणा व ऊर्जा मिळते

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण राजवाडा येथील प्रताप सिंह हायस्कूलमध्ये झालेले आहे ज्या महामानवाने आपल्या विद्येच्या जोरावर या जगात स्थान मिळवले या भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे जनक भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या शाळेमध्ये शिक्षण घेतले त्याही शाळेला पर्यटकांनी भेट दिली पाहिजे अशी व्यवस्था ही झाली पाहिजे

पर्यटकांनी येऊन कास बामनोली ठोसेघर निसर्गाचा आनंद लुटून तो परत तसाच सातारा शहरांमध्ये न थांबता गेल्यास सातारा शहरातील नावाजलेली खाद्य संस्कृतीला त्याचा उपयोग होणार नाही सातारा शहरांमध्ये पर्यटकांनी येऊन विविध भागांमध्ये भेट दिली पाहिजे

साताराची सुप्रसिद्ध असलेली मिठाई सातारा कंदी पेढा व इतर वस्तू खरेदी केला पाहिजे विविध ठिकाणी भेटी दिल्यामुळे त्या ठिकाणाच्या जवळ आसपास असलेल्या छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना त्याचा नक्कीच फायदा होणार आहे .त्यासाठी नगरपालिकेने पार्किंगची योग्य दक्षता घेतली पाहिजे. समर्थ मंदिर परिसरातील होणारी वाहतुकीची कोंडी दूर करावी लागेल राजवाडा परिसरामध्ये, व पवई नाक्यावरील रयत शिक्षण संस्थेच्या समोरील भागामध्ये योग्य ती उपाययोजना करावी लागेल तरी नगरपालिका, पोलीस प्रशासन ,जिल्हा परिषद ,जिल्हा माहिती व जनसंपर्क कार्यालय यांनी या विविध ठिकाणांचे महत्त्वपूर्ण माहिती सर्व पर्यटकांसमोर व लोकांमध्ये जाईल तेव्हाच स्वतःहून पर्यटक सातारा शहरांमध्ये तसेच जिल्ह्यातील विविध शहरांमध्ये काही वेळ घालवतील अशी उपयोजना पाहिजे .

मान्य आहे की पर्यटकांना जे हवे तेच पाहण्यात रस असतो परंतु शहरातील बाकींच्या गोष्टींची माहिती त्यांना मिळालेच नाही तर ते तिथे पर्यंत पोहोचू शकणार नाहीत येणाऱ्या कालावधीमध्ये सातारा शहरातील व जिल्ह्यातील विविध ठिकाणांची ऐतिहासिक माहिती पर्यटकांना उपलब्ध झाली पाहिजे तरच पर्यटक शहरांमध्ये येथील खरेदी करतील त्याचा फायदा जिल्ह्यातील आर्थिक उलाढाल साठी होईल व सातारा जिल्ह्यातील होणारी तरुणांचे स्थलांतर काही अंशी थांबेल धन्यवाद

**- रजनी बोभाटे**
**संचालिका एस एस मसाले**
**सातारा**
**९४०४२३४२४३**
**९९६०१३२२०७**

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# दरवाढीच्या झटका; आता अमूलचे दूध २ रुपयांनी महागले




**सोलापूर :** महागाईच्या सावटाखाली लोकसभा निवडणूक लढविली गेली. या महागाईचा विचार करून मतदान होईल अशी अपेक्षा विरोधी पक्षांना होती. परंतु एक्झिट पोलचे आकडे काही वेगळेच सांगत असून लोकसभा निवडणूक संपताच वेगवेगळ्या सेवा, उत्पादनांचे दर वाढण्यास सुरुवात झाली आहे. एनएचएआय टोल दरात वाढीची घोषणा करत नाही तोच देशातील सर्वात मोठा दूध उत्पादन संघ अमूलने प्रति लीटरमागे दोन रुपयांची वाढ जाहीर केली आहे.

गुजरात मिल्क मार्केटिंग फेडरेशन उद्यापासून म्हणजेच ३ जूनपासून ही दरवाढ लागू केली असून याचा परिणाम सामान्यांच्या खिशावर होणार आहे. या दरवाढीमध्ये अमूल गोल्ड, अमूल ताजा आणि अमूल शक्ती आदी उत्पादने आहेत. अमूल ताज नाना पाउच सोडून सर्व दुधाचे दर वाढविण्यात आले आहेत.

नव्या दरवाढीनुसार अमूल गोल्डच्या अर्धा लीटर दुधाची किंमत ३२ रुपयांवरून ३३ रुपये झाली आहे. अमूल ताजाची किंमत २६ रुपयांवरून २७ रुपये झाली आहे. अमूल शक्तीची किंमत २९ रुपयांवरून ३० रुपये झाली आहे. हे दर अहमदाबादमधील आहेत. महाराष्ट्रासह देशभरात या दरात बदल होऊ शकतात. अमूलने दरवाढ केल्यानंतर आता मदर डेअरीसारख्या कंपन्याही त्यांच्या दूध दरात वाढ करण्याची शक्यता आहे.

दरवर्षीप्रमाणेच यंदाही टोल दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने टोल दराबाबत मोठा निर्णय घेतला आहे. यानुसार आज मध्यरात्रीपासून देशभरातील सर्वच टोलनाक्यांवर ३ ते ५ टक्के अधिक टोल आकारला जाणार आहे. एप्रिलमध्ये ही वाढ करण्यात येणार होती परंतु लोकसभा निवडणुकीमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती.

## डिंभा डाव्या कालव्यात युवक बुडाला

**नारायणगाव :** वारूळवाडी येथील चिमणवाडी (तालुका जुन्नर ) परिसरात डिंभा डाव्या कालव्यामध्ये किलोमीटर क्रमांक ४३ येथे एस के एफ जवळ एक युवक पोहायला गेला असता पाण्यात बुडाल्याची घटना घडली आहे.

उन्हाची तीव्रता पाहता अनेक युवक पोहण्यासाठी धरण, कालवा, शेततळे, विहीर तसेच ज्या ठिकाणी पाणी आहे तेथे पोहण्यासाठी जाण्याचे प्रमाण सध्या वाढले आहे. परंतु धोकादायक पद्धतीने पोहणे जीवावर बेतत आहे.

गेल्या काही दिवसात जुन्नर आंबेगाव व अनेक ठिकाणी पाण्यामध्ये बुडून मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढली आहे. विशेषता यामध्ये लहान मुले व युवक यांची संख्या जास्त आहे. वारूळवाडी येथे डिंबा डाव्या कालव्यामध्ये चिमणवाडी, वारूळवाडी परिसरात श्रेयस नवनाथ डोके (वय २० वर्ष, रा.नारायणगाव) हा आपल्या मित्रांसमवेत आज दिनांक ३१ रोजी दुपारी दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास पोहायला गेला असता पाण्यात बुडाला असल्याची माहिती नारायणगाव पोलीस स्थानकाचे सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.

# बचत गट महिला समृध्दी कर्ज योजनेचा लाभ कोणाला अन् कसा घेता येईल?

महिला समृध्दी कर्ज योजनेची सविस्तर माहिती जाणून घेऊया. त्यामध्ये ही योजना काय आहे? उद्दिष्ट, पात्रता, अटी, फायदे, व्याजदर, कर्ज किती मिळणार, परतफेड कालावधी, अर्ज कुठे करायचा? कागदपत्रे कोणती? याबाबतची सर्व माहिती जाणून घेऊयात...

महिला समृध्दी कर्ज योजना : महिला व्यावसायिकांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि त्यांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी भारत सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य (समाज कल्याण) विभागाकडून महिलांसाठी हे धोरण राबविले जात आहे. या योजनेंतर्गत महिला व्यवसायिकांना तसेच समाजातील उपेक्षित घटकातील महिला मागासवर्गीयांना आर्थिक मदत दिली जाते.

बँक आणि एनबीएफसी व्याज दर : महिला समृध्दी योजनेंतर्गत लागू केलेल्या कर्जापैकी ९५ टक्के कर्ज दिले जाते. उर्वरित ५ टक्के कर्ज राज्य वाहिनी एजन्सी (एससीए) किंवा स्वतः लाभार्थी देते. मार्गदर्शकतत्त्वांमध्ये असं सांगितलंय की, कर्ज वितरणाच्या तारखेपासून घेतलेल्या कर्जाचा उपयोग कालावधी ४ महिन्यांच्या आत करावा.




महिला समृध्दी कर्ज योजना पात्रता :

- लाभार्थी मागासवर्गीय जात किंवा अनुसूचित जातीचा असला पाहिजे.
- बचत कर्ज गट (बचत गट) आणि समाजातील मागासवर्गीय घटकातील महिला उद्योजकच या कर्ज योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत.
- महिला लाभार्थ्यांचे किमान वय १८ ते ५० वर्षांपर्यत असावं.
- लाभार्थी बीपीएल श्रेणीतील असावं.
- अर्जदाराच्या वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी ९८००० रुपयांपर्यंत असावे तर शहरी भागासाठी अर्जदार कुटुंबाचे उत्पन्न १ लाख २० हजारापर्यंत असावे.
- कोणतेही गुन्हेगारी रेकॉर्ड असू नये.

कर्ज आवश्यक कागदपत्रे

- अर्ज
- जात प्रमाणपत्र
- बँक खाती
- उत्पन्न प्रमाणपत्र
- आधार कार्ड
- पासपोर्ट आकाराचा फोटो
- रहिवासी पुरावा (वीज बिल किंवा रेशन कार्ड)
- ओळख पुरावा - मतदार ओळखपत्र
- सेल्फ-ग्रुप मेंबरशिप आयडी कार्ड

महिला समृध्दी कर्ज योजना योजनेचे स्वरुप

- व्याज दर ४ टक्के
- परतफेडीचा कालावधी ३ वर्षे
- बचत गटांमार्फत ग्रामीण व शहरी भागातील महिलांना कर्ज पुरवठा
- प्रकल्प मर्यादा ५ लाखांपर्यंत बचत गटातील २० सभासदांना प्रत्येकी २५,००० रुपये.
- राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग - ९५ टक्के
- राज्य महामंडळाचा सहभाग - ५ टक्के
- लाभार्थीचा सहभाग निरंक

महिला समृध्दी कर्ज योजना अर्ज करण्याची पध्दत : लाभत्यांना अर्ज करून लाभ घेण्यासाठी कर्ज मागणी अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून कर्ज प्रस्ताव महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात सादर करावे लागतील.

टीप : वरील योजनेच्या नियमात किंवा आणखी काही बाबींमध्ये बदल असू शकतात. वाचकांच्या माहितीकरिता सदर माहिती संकलित करण्यात आली आहे. तरी काही त्रुटी वाटल्यास वाचकांनी पुनश्च एकवार खात्री करून घ्यावी.

# लोकसभेचे मतदान संपताच टोल दरात मोठी वाढ

## मध्यरात्रीपासून लागू करण्याचे आदेश




दरवर्षीप्रमाणेच यंदाही टोल दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने टोल दराबाबत मोठा निर्णय घेतला आहे. यानुसार आज मध्यरात्रीपासून देशभरातील सर्वच टोलनाक्यांवर ३ ते ५ टक्के अधिक टोल आकारला जाणार आहे. एप्रिलमध्ये ही वाढ करण्यात येणार होती परंतु लोकसभा निवडणुकीमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती.

रविवारी रात्री १२ वाजल्यापासून टोल दरवाढ लागू केली जाणार आहे. यानुसार प्रत्येक टोलमागे ३ ते ५ टक्क्यांची वाढ केली जाणार आहे. देशभरात जवळपास ११०० टोलनाके आहेत. या सर्व टोलनाक्यांवर ही वाढ केली जाणार आहे. निवडणूक प्रक्रिया संपल्यामुळे टोलच्या दरात संशोधन करण्यात आल्याचे एनएचएआयच्या अधिकाऱ्याने सांगितले आहे.

या टोल दर वाढीचा लाभ आयआरबी आणि अशोक बिल्डकॉन या कंपन्यांना होणार आहे. भारतात जवळपास १४६,००० किमी लांबीचे महामार्ग आहेत. यामध्ये जगात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. २०१८/१९ मधील २५२ अब्ज रुपयांवरून २०२२/२३ आर्थिक वर्षात टोल संकलन ५४० अब्ज रुपये (६.५ अब्ज) पेक्षा जास्त झाले आहे. रस्ते वाहतूक, वाहने वाढल्याने तसेच टोलमध्ये वाढ केल्याने संकलनात एवढी मोठी वाढ झाली आहे.

# पंढरपुरात तोबा गर्दी; रांगेत थांबलेल्या भाविकांना सात तासांनंतर देवाचे दर्शन



**सोलापूर :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे बदललेले रूप पाहण्यासाठी आणि विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पंढरीत गर्दी केली. दर्शनासाठी रांगेत थांबलेल्या भाविकांना सात ते आठ तासांचा वेळ लागला.विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन म्हणजेच देवाच्या पायाला स्पर्श करणे. हे दर्शन रविवारपासून सुरू झाले. रांगेतील पहिल्या भाविकांला फुले देऊन मंदिर समितीने स्वागत केले. रविवारी पहाटे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक आणि दर्शन रांगेतील पहिले वारकरी बालाजी मुंडे यांच्या उपस्थितीत देवाची पहाटेची नित्यपूजा झाली. या महापूजेनंतरच पदस्पर्श दर्शनाला सुरुवात झाली. यावेळी वारकरी सांप्रदायिक प्रमुख महाराज मंडळीही उपस्थित होते.

७७ दिवसांनंतर पुन्हा पदस्पर्श दर्शन सुरू झाल्याने मंदिरामध्ये फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदिरामध्ये पहाटेपासूनच भक्तांची गर्दी होती. पदस्पर्श दर्शनासाठी रात्रीपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. यामुळे दर्शनाची रांग दोन नंबरच्या पत्रा शेडपर्यंत पोहोचली होती. दर्शन रांगेत थांबलेल्या भाविकांना सात ते नऊ तासांनंतर विठ्ठलाचे दर्शन मिळूनदेखील भाविक आनंदी व समाधानी असल्याचे दिसून येत होते.

# कोथिंबीर, हिरव्या मिरचीने बिघडले भाज्यांचे बजेट

**नागपूर :** कडक उन्हाळ्यात भाजीपाल्यांच्या दरवाढीने गृहिणींचे स्वयंपाकघराचे बजेट बिघडले आहे. सध्या कोथिंबीर आणि हिरव्या मिरच्यांचे भाव आकाशाला भिडले असून किरकोळमध्ये कोथिंबीर २०० रुपये आणि हिरव्या मिरचीची ८० ते ९० किलो दराने विक्री होत आहे. किरकोळमध्ये काहीभाज्यांचेभाव जास्तच आहेत. काही महिन्यांआधी टोमॅटो सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले होते, हे विशेष.

मतमोजणीमुळे कळमना कृषी उत्पन्न बाजार समितीतील सातही बाजाराचे व्यवहार ५ जूनपर्यंत बंद आहेत. मुख्यत्त्वे फळे आणिभाज्यांचीआवक बंद राहिल्याचा परिणाम दरवाढीवर झाला आहे. लगतचे जिल्हे आणि अन्य राज्यातील उत्पादक शेतकऱ्यांनी भाज्या कळमना बाजारात विक्रीसाठी आणणे बंद केले आहे. त्याच कारणांनी कॉटन मार्केटमध्ये आवक वाढली आहे.३०० पोते मिरची तर कोथिंबीरची आवक फार कमी

महात्मा फुले फळ व सब्जी अडतिया असोसिएशनचे (कॉटन मार्केट) सचिव राम महाजन म्हणाले, सध्या बाजारात ६० ते ७० लहानमोठ्या गाड्या विक्रीसाठी येत आहे. दरदिवशी ८०० पोत्यांपर्यंत (प्रति पोते ४० किलो) होणारी आवक सध्या ३०० वर आली आहे. पंजाब आणि रायपूरहून आवक आहे. किरकोळमध्ये ८० ते ९० रुपये भाव आहे. किरकोळमध्ये कोथिंबीर २०० रुपयांवर गेल्यामुळे गृहिणींनी खरेदी थांबविली आहे. सध्या थोडीफार आवक छिंदवाडा, सौंसर, रामकोना या भागातून होते. सध्या लिंबू दर्जानुसार ५०० ते ६०० रुपये शेकडा आहे. किरकोळमध्ये १० ते १२ रुपये नग भाव आहे.

कडक उन्हामुळे आवक कमी असल्याने पालेभाज्या महाग आहेत. किरकोळमध्ये पालक ७० ते ८०, मेथी १००, चवळी ४०, घोळ भाजी ५० रुपये किलो आहे.

रायपूर, दुर्ग, भिलई येथून ढेमसची आवक परवळ, टोंडले, ढेमस, कारले, दोडके, लवकी मध्यप्रदेशच्या राजनांदगाव, रायपूर, दुर्ग, भिलई येथून विक्रीसाठी येत आहे. तर जबलपूर येथून बीन्स शेंग तर फणस ओरिसा येथून येत आहे. अन्य भाज्यांची आवक स्थानिक उत्पादक शेतकऱ्यांकडून सुरू आहे. ठोकमध्ये भाव आटोक्यात तर किरकोळमध्ये दुप्पट भावात



विक्री होत आहे.भाज्यांचे प्रति किलो भाव :

| भाजीपाला | ठोक भाव | किरकोळ भाव |
|---|---|---|
| कोथिंबीर | १४० | २०० |
| हिरवी मिरची | ५० | ८०-९० |
| टोमॅटो | २० | ३०-४० |
| फूल कोबी | २० | ४० |
| कारले | ३० | ५० |
| सिमला मिरची | ३० | ५०-६० |
| परवळ | २५ | ४०-५० |
| टोंडले | २० | ४० |
| ढेमस | ३० | ५० |
| दोडके | ३० | ५० |
| कोहळं | १० | २० |
| लवकी | १० | २० |
| फणस | ४० | ७० |
| चवळी शेंग | २५ | ४० |
| गवार | ४० | ७० |
| बीन्स शेंग | ६० | १०० |
| पालक | ३० | ५० |
| मेथी | ६० | १०० |
| घोळ | २० | ३०-४० |
| चवळी | २० | ३०-४० |
| कैरी | २५ | ४० |
| काकडी | १५ | २५-३० |
| मूळा | २० | ३०-४० |
| गाजर | ३० | ५० |

# शिरोळ भूषण पुरस्कार पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते प्रदान

**शिरोळ :** दलित मित्र डॉ. अशोकराव माने यांनी सामाजिक बांधिलकीबरोबरच आदर्शवत ग्राम संस्कृतीला चांगुलपणाची दिशा दिली आहे. समाजातील कर्तबगार कर्मयोगीचां पुरस्कार देत त्यांचा गौरव करून माने प्रतिष्ठानने आदर्श निर्माण केला आहे विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीकडून डॉ अशोकराव माने यांना उमेदवारी मिळाली तर त्यांना आमदार करण्यासाठी माझे पूर्णपणे पाठबळ राहील असा विश्वास कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी शिरोळ येथील शिरोळ भूषण पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी व्यक्त केला.

दलित मित्र डॉ अशोकराव माने यांच्या वाढदिवसानिमित्त दलित मित्र डॉ अशोकराव माने सामाजिक प्रतिष्ठान व शिरोळ नगरपरिषद यांच्यावतीने देण्यात येणारा शिरोळ भूषण पुरस्कार उद्योगपती अशोकराव टारे रेणुका भक्त मंडळाचे अध्यक्ष दिलीपराव माने यांना तर आदर्श माता श्रीमती रत्नाबाई आण्णाप्पा शेट्टी यांना पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला या समारंभात सौ रेखा अमर पाटील मलिकवाडे यांचा विशेष गौरव करण्यात आला शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष रावसाहेब देसाई यांनी स्वागत केले माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील यांनी प्रास्तावित केले दलित मित्र अशोकराव माने यांचा सहपत्नीक सत्कार करण्यात आला.




या समारंभात बोलताना पालकमंत्री हसन मुश्रीफ पुढे म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीतही समाजात कार्यरत राहत असताना समाजाप्रती आपुलकीची भावना ठेवून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून आजच्या तरुणांसमोर आदर्श निर्माण करणाऱ्या कर्तबगार व्यक्तींचा सन्मान करण्याचा स्तुत्य उपक्रम दलित मित्र डॉ अशोकराव माने यांनी राबवला आहे यानिमित्ताने आदर्श व्यक्तीने केलेल्या कामाची पोचपावती मिळत असते आजच्या पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी आपापल्या क्षेत्रात आपल्या कार्यातून समाजाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे त्यांच्या हातून असेच कार्य यापुढेही घडत राहो सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करावा असे आवाहनही त्यांनी केले.

या समारंभाचे अध्यक्ष आमदार डॉ विनय कोरे बोलताना म्हणाले की श्री दत्तगुरूंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमीत आपलं आयुष्य जगत असताना ज्यांनी आगळे वेगळे कर्तुत्व निर्माण केले त्या कर्तुत्वांची ओळख आजच्या पिढीला व्हावी यासाठी दलित मित्र डॉ अशोकराव माने यांनी आदर्शवत व्यक्तींना पुरस्कार देण्याचा उपक्रम सुरू केला यामुळे कर्तबगार कर्मयोगी यांचा यथोचित सन्मान केला जात आहे राजकारण बाजूला ठेवून या कार्यक्रमासाठी सर्व गटाचे नेते व्यासपीठावर एकत्र येऊन शहराच्या नावलौकिक करण्याची परंपरा अखंडपणे जपत आहेत याचा एक कार्यकर्ता म्हणून मला सार्थ अभिमान आहे उद्योगपती अशोकराव टारे यांनी प्रतिकूल परिस्थितीत मात करत नोकरी आणि शेती व्यवसाय सांभाळत मराठी उद्योजक काय करतो हे आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे तर दिलीपराव माने यांनी सामाजिक क्षेत्रात काम करत असताना समाजाने भक्तिमार्ग जपला पाहिजे यासाठी विविध देवी व देवतांच्या माध्यमातून महाप्रसादाचे आयोजन करून धार्मिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला या कामासाठीच परमेश्वरांनी त्यांची निवड केली आहे शेतकरी चळवळीच्या माध्यमातून जिल्हा परिषद सदस्य ते खासदार पर्यंत राजकारणात यश मिळवणाऱ्या आणि शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी देशातील विविध शेतकरी संघटनांच्या सोबत लढा देणाऱ्या चळवळीचा नेता राजू शेट्टी यांना निर्माण करण्यासाठी त्यांच्या आई श्रीमती रत्नाबाई शेट्टी यांचे पाठबळ आणि संस्कार कारणीभूत आहेत त्यांनाही आदर्श माता पुरस्कार देऊन गौरवण्यात आले तर एकत्र कुटुंबात राहून कुटुंबाच्या प्रगतीसाठी आपल्या पुतण्यांनाही आईप्रमाणे प्रेम देणाऱ्या सौ रेखा पाटील यांचा विशेष गौरव करून आजची सून कशी राहावी याचा आदर्श समाजासमोर देण्याचा प्रयत्न केला अशा चारही पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे

माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले की समाजात विविध क्षेत्रात आदर्शवत काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन त्यांना पुढील कार्यासाठी प्रेरणा देण्याचा उपक्रम अशोकराव माने यांनी राबवला आहे शेतकरी कुटुंबातील पोरग्याला चळवळीबरोबर समाजकार्यात काम करण्यासाठी पाठबळ देणाऱ्या माझ्या आईचा या ठिकाणी सन्मान केला याचा मला अभिमान असून तिच्या प्रोत्साहनामुळेच शेतकरी चळवळ मला पुढे नेता आली.

शिरोळ भूषण पुरस्कार प्राप्त दिलीपराव माने म्हणाले की शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन समाजात भक्ती व धार्मिक भावना जपण्याचे काम सातत्याने करत आलो यामुळे महाप्रसादासारखे धार्मिक उपक्रम राबवून परमेश्वराचे चिंतन समाजाने करावे यासाठी प्रयत्न केले तसेच गावात शांतता सामाजिक सलोखा राहावा यासाठी पुढाकार घेतला आजच्या पुरस्काराने केलेल्या कामाची पोच पावती मिळाली या निमित्ताने पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी शिरोळ तालुक्यातील अतिक्रमणधारकांचा प्रश्न निकालात काढावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

सोहळ्यास माजी आमदार उल्हास पाटील माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण इंगवले राजवर्धन नाईक निंबाळकर विजय भोजे प्रसाद खोबरे जनसुराज्य पक्षाचे युवा प्रदेशाध्यक्ष समित कदम जिल्हा बँकेचे संचालक विजयसिंह माने वारणा दूध संघाचे संचालक अरुण पाटील स्वाभिमानीचे नेते संदीप कारंडे दत्तचे संचालक अनिलराव यादव, माजी सरपंच शिवाजीराव माने - देशमूख , गजानन संकपाळ , पंचायत समिती उपसभापती सचिन शिंदे , माजी नगराध्यक्षा सौ निता माने, सौ रेखादेवी माने सौ सारिका माने महेश गायकवाड माजी उपसरपंच प्रताप उर्फ बाबा पाटील , संचालक मार्केट कमिटी जयसिंगपूर ब शिवाजी चव्हाण, विजयसिंह माने - देशमुख, रामदास गावडे, गुरुदत्त शुगर्सचे माजी नगरसेवक डॉ . अरविंद माने , पै प्रकाश गावडे, श्रीवर्धन माने - देशमुख , पंडीत काळे (बापूजी), दादासाहेब कोळी, दयानंद जाधव ,अध्यक्ष अजिंक्यतारा मंडळ धनाजीराव पाटील - नरदेकर, भाजपा शहराध्यक्ष संभाजी भोसले, पत्रकार दगडू माने, सामाजिक कार्यकर्ते संजय शिंदे, बजरंग काळे (गुरुजी, सुभाष आवळे, किरण गावडे, परवेझ मेस्त्री, आयूब मेस्त्री, सुजित पाटील, वैभव माने, सतिश आडगुळे, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार शिरोळ मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीचे संचालक बबन बन्ने अमरसिंह धुमाळ , प्रतिष्ठानचे सदस्य सतिश राजमाने, ओंकार माने, संतोष माने, स्वामी समर्थ महिला सुतगिरणी कार्यकारी संचालक सुहास राजमाने , डॉ अभिजित माने , शाहू इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक सागर कोळी यांच्यासह देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार शिरोळ मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी छत्रपती शाहू को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट माने प्रतिष्ठान यांचे सर्व पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरोळच्या दुय्यम निबंधक कार्यालयात बोगस खरेदीपत्र

## शेतकऱ्यांनी दिला आमरण उपोषणाचा इशारा

**शिरोळ :** शिरोळ येथील दुय्यम निबंधक यांनी अकिवाट येथील शेत जमीन गट नंबर ११३३ / ७ या जमिनीचा कोणत्याही कायदेशीर बाबीची पूर्तता व शाहनिशा न करता बोगस व बेकायदेशीर खरेदीपत्र केले आहे याची चौकशी तातडीने करून दुय्यम निबंधक शिरोळ यांच्यावर कडक कारवाई करावी, अन्यथा दुय्यम निबंधक शिरोळ येथील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा अकिवाट येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी मुद्रांक जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे. यामुळे खळबळ उडाली असून पुन्हा एकदा दुय्यम निबंधक कार्यालयाचा गैरप्रकार चव्हाट्यावर आला आहे

निवेदनात म्हटले आहे की, १२ मार्च २०१४ रोजी दस्त क्रमांक १६८२/२०२४ हे खरेदीपत्र करताना राजाराम यशवंत लाटवडे हे मयत असताना देखील त्यांच्या नावाचे वटमुखत्यार जोडून खोटे प्रतिज्ञापत्र जोडून इतर हक्कात जुन्या रजिस्टर खाते साठे खताची नोंद असताना शिवाय इतर हक्कात सोसायटी व बँकेचा बोजा असताना देखील त्यांची एनओसी न घेता खरेदीदस्त शेत जमिनीचा बोगस खरेदी व्यवहार सायंकाळी ६ वाजता करून नोंदविला आहे. वास्तविक पाहता दुय्यम निबंधक यांनी जमिनीचे रेडीरेकनर प्रमाणे ५७ लाखाच्या पुढे किंमत होत असताना सदर जमिनीचा मोबदला फक्त १६ लाख इतका दाखवून शासनाचा महसूल बुडवला आहे शिवाय रेडीरेकनरच्या किमतीपेक्षा कमी किमतीत खरेदी करता येत नसताना खरेदी पत्रातील रक्कम तपशील अनुसार मूळ मालकांनी सदरच्या रकमा मिळाला नाहीतच त्या दस्ताच्या तपशिलास बोगस व पोकळ रखमा दाखवलेल्या आहेत.

दुय्यम निबंधक यांनी बिनधास्तपणे राजरोसपणे बोगस दस्त नोंदविला आहे. यामुळे आम्ही सर्व कुटुंब भूमीहिन होऊन रस्त्यावरती आलो आहोत. या बोगस खरेदी पत्रामुळे आमची उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे आम्हाला आत्महत्या करण्याशिवाय पहिल्या राहिलेला नाही. असा स्पष्ट निवेदनात उल्लेख करून दुय्यम निबंधक यांच्यावर कारवाई झाली नाही तर त्यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा निवेदनात शेवटी देण्यात आला असून निवेदनावरती अरुणरावसो लाटवडे, सौ संगीता जगन्नाथ कदम, श्रीमती अलका राजाराम लाटवडे, सौ दिपाली चंद्रकांत करडे, सौनिता संदीप शिंदे, निखिल राजाराम लाटवडे, वैशाली रामचंद्र जाधव, सुरेखा संदीप काटकर, सीमा सुजित करडे, रेखा दीपक लाटवडे, प्रियंका योगेश तनमोरे, शिवतेज दिपक लाटवडे, अनिल गणपती लाटवडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मुंबई बॉम्ब स्फोटातील आरोपीचा कळंबा कारागृहात खून

**कोल्हापूर :** १९९३ मधील मुंबई बॉम्ब स्फोटातील आरोपी मुन्ना उर्फ मोहम्मद अली खान उर्फ मनोजकुमार भवरलाल गुप्ता (वय ७०) याचा कळंबा मध्यवर्ती कारागृहात पाच कैद्यांनी ड्रेनेजचे लोखंडी झाकण डोक्यात घालून निर्घृण खून केला. ही घटना रविवारी (दि. २) सकाळी साडेसातच्या सुमारास कारागृहातील आंघोळीच्या हौदावर घडली. याप्रकरणी कारागृहातील न्यायालयीन बंदी प्रतीक उर्फ पिल्या सुरेश पाटील, दीपक नेताजी खोत, संदीप शंकर चव्हाण, ऋतुराज विनायक इनामदार आणि सौरभ विकास सिद्ध या पाच जणांची चौकशी जुना राजवाडा पोलिसांकडून सुरू आहे.- ऊत्एठ्ढखडएचएछ्ढयाबाबत अधिक माहिती अशी की, मुंबईत १९९३ मध्ये झालेल्या साखळी बॉम्ब स्फोटातील आरोपी मोहम्मद अली खान हा कळंबा कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. रविवारी सकाळी तो आंघोळीसाठी कारागृहातील हौदावर गेला. त्याठिकाणी आधीच थांबलेल्या कैद्यांसोबत त्याचा वाद झाला. वादाचे रुपांतर मारामारीत झाले. त्यावेळी न्यायालयीन बंदी प्रतीक पाटील, दीपक खोत, संदीप चव्हाण, ऋतुराज इनामदार आणि सौरभ सिद्ध यांनी ड्रेनेजवरील लोखंडी झाकण काढून खान याच्या डोक्यात घातले.

वर्मी घाव लागल्याने खान जागेवरच कोसळला.कैद्यांमधील मारामारीचा प्रकार लक्षात येताच सुरक्षा रक्षकांनी धाव घेऊन संशयित हल्लेखोरांना ताब्यात घेतले. घटनेची माहिती मिळताच जुना राजवाडा पोलिसांनी कारागृहात जाऊन पंचनामा केला. गेल्या दीड ते दोन महिन्यात शंभराहून अधिक मोबाइल सापडल्याने कळंबा कारागृहाचा कारभार चव्हाट्यावर आला होता.

वरिष्ठ अधिका-यांनी विशेष तपासणी मोहीम राबवून ११ कर्मचा-यांसह दोन अधिका-यांना बडतर्फ केले, तर दोन अधिका-यांच्या तडकाफडकी बदल्या केल्या होत्या. त्यानंतरही कळंबा कारागृहातील गैरप्रकार थांबलेले नाहीत.

# साताऱ्यात बंदोबस्ताच्या जबाबदारी सोबतच माणुसकीचे कर्तव्य

**सातारा :** महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने पोलीस यंत्रणेवर आहे. त्यामुळे पोलीस कर्तव्य व जबाबदारी पार पाडण्यासाठी अहोरात्र कष्ट घेत आहेत. साताऱ्यात लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. ही बंदोबस्ताची जबाबदारी सोबतच माणुसकीचे हे कर्तव्य तीन पोलीस जवानांनी पार पाडल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

४५ सातारा लोकसभा मतदार संघाची निवडणूक सात मे रोजी पार पडली. त्यानंतर मंगळवार दिनांक ४ जून रोजी शासकीय गोदाम, सातारा औद्योगिक वसाहत, देगाव रोड सातारा या ठिकाणी मतमोजणी होत आहे. त्या अनुषंगाने सातारा पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला. या बंदोबस्तासाठी



**पोलीस बंदोबस्तापूर्वी रक्तदान शिबिरात रक्तदान करून आलेले पोलीस जवान.**

दाखल झालेले पोलीस जवान अमित भरत माने, रोहित विश्वासराव पवार व जयवंत यशवंत गोसावी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या ठिकाणी सलग दोन दिवस बंदोबस्त करण्यासाठी निघाले.


याचवेळी देगाव रस्त्यावर एका ठिकाणी रक्तदान शिबिराचा नामफलक पाहून या तिन्ही पोलीस जवानांनी त्वरित रक्तदान शिबिरात जाऊन रक्तदान करण्याचा निर्णय घेतला. पोलीस कर्तव्य म्हणजे लोकांचे रक्षण करणे. त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे. सध्या सातारा जिल्ह्यात रक्ताचा पुरवठा कमी होत असल्याने अनेक रुग्णांना इच्छुक रक्तासाठी पायपीट करावी लागते. काहींना रक्त देतं का कोणी रक्त... असे म्हणण्याची पाळी आली.

समाजात अनेक धडधाकट लोक स्वतःला समाजसेवक म्हणून घेतात. परंतु, कधीही अशा रक्तदान शिबिरात जाऊन त्यांनी रक्तदान केले .असं कधी दिसून येत नाही. याला काही अपवाद असू शकतात. त्यांची संख्या फार कमी आहे. परंतु या तीन पोलीस जवानांनी स्वतः रक्तदान शिबिराच्या स्थळी जाऊन रक्तदान केलेले आहे. या पोलीस जवानांना सामाजिक कार्यकर्त्या व भारत जनरिक मेडिकल स्टोरच्या पल्लवी माने यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी जेष्ठ पत्रकार अजित जगताप व विशाल कदम उपस्थित होते.

बालाजी ब्लड बँकेच्या वतीने त्यांनी रक्तदान करून मानवता जपली आहे खरं म्हणजे पोलीस बंदोबस्तासाठी अनेक पोलीस अधिकारी व पोलीस जवान हे ऊन- वादळ- वारा- पावसाची तमा न बाळगता औद्योगिक वसाहती मधील गोदामामध्ये बंदोबस्त करीत आहेत. सकाळी सात वाजल्यापासून पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी या ठिकाणी आलेले आहेत तर मंगळवार दिनांक ४ जून रोजी पहाटे पाच वाजता पोलीस आपल्याला नेमलेल्या ठिकाणी जाऊन बंदोबस्त करणार आहेत.

या बंदोबस्तासाठी आलेल्या तीन जवानांनी रक्तदान शिबिरात रक्तदान करून कर्तव्य व जबाबदारी यांचा मिलाप करून माणुसकी जपलेली आहे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# महालक्ष्मीच्या दर्शनासाठी लाखावर भाविक



**कोल्हापूर :** उन्हाळ्याच्या सुट्टीमुळे करवीर निवासिनी महालक्ष्मी मंदिर, दख्खनचा राजा जोतिबा मंदिर येथे रविवारी भाविकांनी गर्दी केली. पर्यटकांच्या उपस्थितीमुळे कोल्हापूर फुलून गेले असून महालक्ष्मीचा दर्शनासाठी लाखावर भाविक जमले होते. उन्हाचा मारा सह्य झाल्याने राबता वाढला आहे.

दरवर्षी उन्हाळा सुट्टीत कोल्हापूरला येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी आते. यावर्षी लोकसभा निवडणुकीचे मतदान राज्यात वेगवेगळ्या टप्प्यात झाले. यामध्ये नागरिक तसेच शासकीय यंत्रणा गुंतून राहिली होती. मतदान पार पडल्यानंतर अनेकजण सुट्टीचा आनंद घेण्यासाठी बाहेर पडले आहेत. हजारो भाविक कोल्हापूर, ज्योतिबा येथे उपस्थिती लावून देवदर्शनाचा लाभ घेत आहेत. पुणे-मुंबई आणि इतर मोठ्या शहरातून भाविक कोल्हापूरमध्ये दाखल होत आहेत. महालक्ष्मी मंदिरात दर्शन मंडप उभारण्यात आला आहे. पायालाच चटके बसून आहेत यासाठी अधून मधून पाणी फवारणी केली जात आहे. रविवारी लाखभर भाविकांनी दर्शन घेतले असल्याची माहिती देवस्थान समितीने दिली.

# तळघरात सापडलेल्या मूर्ती पंढरपुरातच राहणार


**सोलापूर :** श्री विठ्ठल मंदिरात मिळून तळघरात सपडलेल्या सर्व मूर्ती पंढरपुरातच राहणार आहे. ज्यांना या मूर्तींचा अभ्यास करायचा आहे, ते अभ्यासक तेथे येऊन अभ्यास करतील, असा निर्णय मंदिर समितीच्या वतीने घेण्यात आला आहे.

विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीची बैठक सहायक अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली मंदिरात घेण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवार, सदस्य संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर महाराज जळगावकर देशमुख, हभप ड. माधवी निगडे, शकुंतला नडगिरे, हभप प्रकाश जवंजाळ, हभप शिवाजीराव मोरे यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते.तसेच मंदिरातील संवर्धन काम करतेवेळी हनुमान गेट येथे मिळालेल्या तळघरातील मूर्ती संग्रहालयात जतन करून ठेवणे. तळघराच्या ठिकाणी माहितीची कोनशिला बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये सापडलेल्या मूर्तीदेखील संग्रहालय करून त्यात ठेवण्यात येणार आहेत. त्या मूर्ती अभ्यासकांना पाहण्यासाठी उपलब्ध असणार आहेत. ज्यांना त्या मूर्तींबाबत अभ्यास करायचा आहे त्यांनी तेथे येऊनच अभ्यास करावा.श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शन रांगेसाठी तयार करण्यात आलेल्या कायमस्वरूपी पत्रा शेडचे पत्रे आषाढी यात्रेपूर्वी बदलण्यात येणार आहेत. तसेच नव्याने दोन पत्रशेड करण्यात येणार आहेत. मंदिर समितीच्या भक्तनिवास येथील भोजनालय चालविण्यास ठेकदाराने नकार दिला आहे. यामुळे त्या ठिकाणी दुसऱ्या ठेकेदाराला भोजनालय चालविण्यासाठी देण्याबाबत चर्चा करण्यात आली आहे. त्याचबरोबर आषाढी यात्रेत विठोबाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीत चर्चा झाली आहे.मुख्यमंत्र्यांना मंदिर समिती देणार आमंत्रणश्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील गाभाऱ्याचे, चौखांबी, सोळखांबी परिसरातील काम झाले आहे. मंदिरातील जतन व संवर्धनाच्या कामाच्या लोकार्पणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आमंत्रण देण्याबाबत मंदिर समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रॉब्लेम ऑफ रुपी.. शतकपूर्तीनिमित्त

# ११ जूनला लंडन येथे जागतिक परिषदेचे आयोजन

**पुणे-सातारा :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२३ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिकस मध्ये 'दि प्रॉब्लेम ऑफ दि रुपी इटस ओरिजिन अंड इट्स सोल्युशन ' या विषयावरील प्रबंध डी. एस.सी पदवीसाठी सादर केला होता त्यांना नोव्हेंबर २०२३ मध्ये डी.एस.सी ही पदवी प्रदान करण्यात आली होती. या घटनेला २०२३ मध्ये शंभर वर्षे पूर्ण झाली. बाबासाहेबांनी ब्रिटीशांचे शासन असतानाही भारताच्या रुपयाचे अवमूल्यन ,रुपयाच्या अस्थिरतेमुळे होणारे भारतीयांचे शोषण यावर पुराव्यानिशी विश्लेषण केले होते. या प्रबंधातून सडेतोड भूमिका मांडून सरकारचे दोषही दाखवले होते .त्यांनी ग्रंथ प्रकाशित करून ब्रिटीश सरकारला व अर्थशास्त्रज्ञ यांना वस्तू स्थिती दाखवली होती. त्यामुळेच पुढे २७ ऑगस्ट १९२५ ला चलन पद्धतीत बदल करण्यासाठी एडवर्ड यंग अध्यक्षतेखाली याच्या रॉयल कमिशनची नियुक्ती झाली. भारतात आर्थिक विषमता का




निर्माण झाली हे बाबासाहेबांनी पटवून देऊन सुवर्ण विनिमय प्रमाप पद्धतीस विरोध केला. हा ग्रंथ केवळ पदवी मिळविण्यासाठी लिहिलेला प्रबंध नव्हता तर पराकोटीची आर्थिक विषमता दूर करण्यासाठी त्यांनी मांडलेली मते आजही उपयुक्त आहेत. या ग्रंथावर १०० वर्षानंतर पुनर्विचार व्हावा, भारतातील आर्थिक प्रश्नांचा इतिहास कळावा,आर्थिक विषमता दूर करण्यासाठी चिंतन व्हावे , आर्थिक वास्तव समजून भविष्यातील सुधारणासाठी वस्तुनिष्ठ भाष्य व्हावे या विधायक हेतूने सायास सहकारी संस्था व मराठी अर्थशास्त्र परिषद यांनी ११ जून २०२४ रोजी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिकस येथे जागतिक परिषदेचे आयोजन केल्याची माहिती या परिषदेचे समन्वयक बार्टी व यशदा संस्थांचे माजी संचालक रविंद्र चव्हाण,पुणे यांनी दिली आहे. तसेच ६ जून १२ जून २०२४ काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण घेत होते त्या ठिकाणी ,तसेच इंग्लंड मधील सांस्कृतिक ,साहित्य ,लोकशाही विषयाशी संबंधित स्थळांना भेटी देणार आहेत.

या परिषदेसाठी भारतातून डॉ.संजोग रॉय, रविंद्र चव्हाण ,डॉ.गजानन पट्टेबहादूर , डॉ. केशव पवार, तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनोमिकस मधील डॅनियल फाईन ,डॉ.जीरेमी स्वीगेलर ,आणि डॉ.फ्रान्सिस्को हे विविध विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेसाठी भारतातून अंदाजे ३५ आणि अन्य देशातील २५ अभ्यासक उपस्थित राहणार आहेत .ज्यात नामवंत न्यायाधीश, वकील ,प्राध्यापक , शासन प्रशासन यातील उच्च अधिकारी , स्व खर्चाने लंडनला उपस्थित राहणार आहेत.

भारतीय अर्थ व्यवस्थेवर भाष्य करण्यासाठी १० थीमची निवड करून भारतातील नामवंत ५० विद्यापीठांना शोध निबंध लिहिण्यासाठी आवाहन केले आहे. १५ संशोधक या परिषदेत शोधनिबंध सादर करणार आहेत. या शिवाय रिझर्व्ह बँक ,नाबार्ड ,इतरबँकचे अधिकारी शोध निबंध पाठविणार आहेत. काही विषय तज्ञ ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत सादर करण्यात आलेल्या विषयतज्ञ यांच्या भाषणाचे ,सादर केलेल्या निबंधाचे व ऑक्टोबर २०२४ ते डिसेंबर २४ मध्ये प्राप्त झालेल्या शोधनिबंधाचे संकलन करून ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस तर्फे ग्रंथ तयार करण्यात येणार आहे. बाबासाहेब यांनी त्या काळात देखील प्रॉब्लेम ऑफ रुपी प्रबंधात धैर्य दाखवून निर्भयतेने भारतीयांच्या हितासाठी व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी मते व्यक्त केली आहेत ती आजही भारताच्या प्रगतीसाठी आवश्यक आहेत. त्यांच्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे आणि सध्याच्या भारतीय आर्थिक प्रश्नाविषयी भाष्य करण्यासाठी ही परिषद आयोजित करत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. पश्चिम महाराष्ट्रातून छत्रपती शिवाजी कॉलेज ,सातारा येथून प्रा.डॉ.सुभाष वाघमारे ,प्रा.तानाजी देवकुळे ,व कृष्णा महाविद्यालय रेठरे बुद्रुक येथील प्रा.विश्वनाथ सोनवणे हे आपला शोधनिबंध सादर करणार आहेत. ज्यांना परिषदेत उपस्थित राहता येत नाही त्यांनी १० थीमच्या कोणतीही एक थीम घेऊन त्या अंतर्गत कोणत्याही उप विषयावर इंग्रजीत शोध निबंध लिहावा. १ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक विकासाची दृष्टी आणि समकालीन प्रासंगिकता २ स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय अर्थ व्यवस्था ,३ सामाजिक बहिष्कार आणि भारतीय अर्थव्यवस्था ४ भारतीय मायक्रो फायनान्स आणि गोल्बल कपिटल फंड ५ मुख्य गुंतवणुकीच्या मार्गाद्वारे ओळखल्या जाणाऱ्या सरकारी रोख्यांचे परिणाम : भारतीय रुपयाची स्थिरता ६ उदारीकरण ,खाजगीकरण आणि जागतिकीकर्ण ड्झत्रः : भारतीय अर्थव्यवस्थेवर तुलनात्मक प्रभाव ७ दिवाळखोरी आणि दिवाळखोरी कोड : भारतीय उद्योग ,बाजार ,आणि अर्थ व्यवस्था ८ ग्लोबल फायनान्स कपिटल आणि नेशन स्टेट ९ आर्थिक असमानता : प्रादेशिक आणि मानवी विकास १० दलित भांडवलशाही आणि काळी भांडवलशाही या थीम देण्यात आल्या आहेत. या विषयाशी संबंधित अनेक उपविषयावर सप्टेंबर अखेर शोधनिबंध पाठवावेत असे रविंद्र चव्हाण ९०४९ २०२०७८ यांनी कळविले आहे.

# सातारा जिल्हा बँकेच्या पंच्याहत्तरी निमित्त डॉक्युमेंटरीसाठी लाखोंचे उड्डाण

**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या अजिंक्यतारा पायथ्याशी पंच्याहत्तर वर्षांपूर्वी सातारा डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड हे रोपट उभे केले. आज त्याचा वटवृक्ष झाला असून महाराष्ट्र मध्ये सर्वाधिक पुरस्कार मिळवणारी सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक आहे. याचा सार्थ अभिमान नक्कीच संचालकांना आहे.

आज पंच्याहत्तरी साजरी करताना अनेक गोष्टींची आठवण येत असली तरी चांगल्या गोष्टी लोकांपर्यंत जाव्या .यासाठी डॉक्युमेंटरी तयार केली जात आहे यासाठी लाखो रुपयाची यंत्रणा सध्या सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या इमारतीत राबत आहेत .फार पूर्वी सर्वसामान्य शेतकऱ्यांची बँक असा नावलौकिक असलेल्या सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये संचालक मंडळाचे लोक व शेतकरी येत होते. त्यांचा पोशाख हा धोतर, गांधी टोपी, सदरा, लेंगा अशा पद्धतीने होता .कधी एस. टी.बसने तर कधी जीप ,मोटर सायकलने बँकेत येणारे संचालक सामान्य शेतकऱ्यांनी पाहिलेले आहे.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेब किसनवीर आबा यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्हा बँकेने खऱ्या अर्थाने सर्वसामान्य शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्यासाठी ही





**सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेत डॉक्युमेंटरी साठी आलेले अत्याधुनिक यंत्रणा (छाया- अजित जगताप, सातारा)**

अर्थवाहिनी उभे केली. आज सर्वसामान्य शेतकरी या बँकेत दिसत नसले तरी शेतकऱ्यांची मुले या बँकेमध्ये सेवा देत आहेत .एवढेच नव्हे तर शासकीय सेवेची संधी असताना सुद्धा अनेकांनी जिल्हा बँकेत आपली सेवा देऊन खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवण्यामध्ये सिंहाचा वाटा उचललेला आहे. याबाबत बँकेच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांना या निमित्त धन्यवाद देणे. हा त्यांचा अधिकार आहे.

सध्या सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीत विकास सेवा सोसायटीमधून ज्यांचा नावाचा ठराव केलेला आहे. अशा सभासद मतदारांची चांगलीच चांदी झाल्याचे अनेकांनी पाहिले आहे. अगदी आठ दिवस नव्हे तर तब्बल पंधरा दिवस या सभासदांना सहलीच्या नावाने त्यांचा सुखकर प्रवास झालेला आहे. आणि यानिमित्त केलेल्या गमतीजमतीमुळे आता अशांना माना सुद्धा खाली घालाव्या लागत आहे. हे आता चर्चेवरून पुढे आलेले आहे.

सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त सर्वत्र नूतनीकरण, सुशोभीकरण यासाठी आडकाठी अथवा दुष्काळाचे कारण न सांगता सढळ हस्ते खर्च करण्यात येत आहे. अगदी रिझर्व बँक ऑफ इंडिया पासून नाबार्ड बँक यांनी प्रशासकीय मंजुरी दिली असल्यामुळे याबाबत फारसं उल्लेख करणे उचित ठरणार नाही. याचबरोबर सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे इमारत नूतनीकरण व अत्याधुनिकरण वेगाने सुरू आहे. याला जोड म्हणून लाखो रुपये खर्च करून सध्या डॉक्युमेंटरी तयार केली जात आहे. यामध्ये शेतकऱ्याची मुलं कुठेही दिसत नसली तरी मोठमोठ्या कंपनींना कंत्राटी देऊन खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे का? हे शोधणे गरजेचे आहे .

सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या इमारतीमध्ये अत्याधुनिक यंत्रणा, कॅमेरे, ट्रॉली येऊन धडकले आहेत. किमान कोट्यावधी रुपये तर निश्चित खर्च होणार आहे. पण, होऊ द्या खर्च... बँक भक्कम आहे. आता या डॉक्युमेंटरी मध्ये संचालकांनी परदेशी वारी करून जे शेती बद्दल आधुनिक माहिती घेतलेली आहे. त्याचा समावेश होणार का नाही? हे डॉक्युमेंटरी पाहिल्यानंतर कळणार आहे. त्याचबरोबर दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचा टाहो, अनेक शेतकऱ्यांना विविध योजनेपासून वंचित राहावे लागलेले आहे. काही शेतकऱ्यांनी कर्ज बाजाराला कंटाळून आत्महत्या सुद्धा केलेली आहे. एवढेच नव्हे तर काहींच्या विमा न मिळाल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई सोडा पण साधी चौकशी करण्याची सौजन्य जिल्हा बँकेने दाखवलेले नाही. अशी तक्रार खटाव तालुक्यातील डांबेवाडी येथील द्राक्ष बाग उत्पादक शेतकऱ्यांनी केली होती. याला आता दीड वर्षे झालेले आहेत .अशा अनेक घटना आहेत .पण याचा आता डॉक्युमेंटरी मध्ये समाविष्ट नक्कीच होणार नाही. कारण दिसतं तसं काही नसतं म्हणून तर जग फसते. या न्यायाने जर पाहिले तर आता जिल्हा बँकेचे डॉक्युमेंटरी ही जरी कौतुकाचा विषय असला तरी जर त्याबाबत शेतकरी संघटना व शेतकऱ्यांना काही आक्षेप नोंदवलेले नाहीत. तरी ही मोठ्या मनाने शेतकऱ्यांकडून एक एक रुपया गोळा करून डॉक्युमेंटरी तयार करावी. यासाठी अनेक जण सहकार्य करतील अशी माहिती शेती तज्ञांनी दिली आहे. दरम्यान याबाबत जिल्हा बँकेत माहिती विचारले असता नेहमीप्रमाणे माहिती देण्यास जाणीवपूर्वक काय केला असेल हे शेतकऱ्यांचेही लक्षात आले .